# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३१/०३/२०२५ ( सोमवार ) सकाळ**

---

## प्राणांतिक अपघात

पोलीस स्टेशन कोंढाळी :— पोस्टे कोंढाळी अंतर्गत मौजा बिहालगोंदी येथे दि. २८/०३/२०२५ चे १९.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे राकेश उर्फ गब्बर वसंता राउत,वय २७ वर्षे,रा. सायखेड, कोंढाळी **आणि मृतक नामे—** सुनिल मुन्ना राठोड,वय २७ वर्षे, रा सायखेड, कोंढाळी हे पॅशन प्रो मोटर सायकल क्रमांक एम. एच. ४० ए. व्ही. ३०८० ने बिहालगोंदी मार्गे कोंढाळी कडे येत असता कोणत्या तरी अज्ञात ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या मोटर सायकलला मागुन ठोस मारल्याने अपघात झाला. सदर अपघातात **मृतक नामे—** सुनिल मुन्ना राठोड,वय २७ वर्षे यांचा नागपुर येथे उपचारा दरम्यान मृत्यु झाला तसेच फिर्यादी राकेश उर्फ गब्बर वसंता राउत ,वय २७ वर्षे हे गंभीर जखमी झाले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे — राकेश उर्फ गब्बर वसंता राउत,वय २७ वर्षे,,रा सायखेड, कोंढाळी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे कोंढाळी येथे आरोपी अज्ञात ट्रक चालका विरूद्ध कलम २८१ १२५(ब), १०६(१) बी एन एस सहकलम १८४, १३४, १७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला अज्ञात ट्रक चालकाचा पोलीस शोध घेत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण),